


HISTORY

# ANNUAL REPORT 2020-21

## SHRI SANT SAVTA MALI GRAMIN COLLEGE


**DINESH KACHKURE**
ASSISTANT PROFESSOR

**VIJAY PANDE**
HEAD & ASSO. PROF.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंती 19

**कार्यक्रमाचे नाव:** **छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती व्याख्यान**
**विभाग:** इतिहास
**कार्यक्रम पद्धती:** व्याख्यान
**दिनांक:** **19 फेब्रुवारी 2020**
**वेळ:** 9.00 स.
**सुत्रसंचलन:** प्रा. विजय पांडे
**अध्यक्ष:** डॉ. एस. आर. टकले
**अध्यक्ष:** डॉ. केशव लहाने
**सहभागी:** श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री
व राजर्षी शाहू महिविद्यालय, पाथ्री
एकूण : 55
**स्वरूप:** ऑनलाईन -महाविद्यालयीन
**विषय:** छत्रपती शिवाजी महाराजांचे पर्यावरणीय धोरण
**वक्ते:** **प्रा. डॉ. . दिनेश कचकुरे**

**उद्दिष्टे:**

1. छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करणे.
2. जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानातून विद्यार्थ्यांना ज्ञान संक्रमीत करणे.
3. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचार संक्रमीत करणे.

**व्याख्यानाचा गोषवारा:**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनचरित्राचा अभ्यास करतांना महाराजांनी महाराष्ट्रातील पर्यावरणाचा बारकाईने विचार केलेला होता. ॲबे कॅरे हा प्रवासी त्यांच्या या धोरणाचा उल्लेख आपल्या प्रवास वर्णनात करतो. औरंगजेब बादशहा 27 वर्ष दक्षिणेत महाराष्ट्राला जिंकण्यासाठी राहिला आणि जिंकला परंतु त्याला हा महाराष्ट्र जनता आलं नाही कारण महाराष्ट्रातील पर्यावरणाची जाणीव त्याला नव्हती आणि ती छत्रपती शिवाजी महाराजांना पुरेपूर होते असे दिसून येते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्वजांनी वेरूळ येथे पर्यावरण संवर्धनासाठी त्याला बनण्याचा प्रयत्न केलेला दिसतो आणि त्यात ते यशस्वी झालेले दिसतात. महाराजांचे पर्यावरण विषयक धोरण समजून घ्यायचे असेल तर रामचंद्रपंत अमात्य यांच्या आज्ञापत्रात हा ग्रंथ आपल्याला अतिशय उपयोगी असा ठरताना दिसून येतो. मध्ये शिवाजी महाराजांचे जलसंवर्धन विषयक प्रयत्न, वृक्ष संवर्धन याविषयी त्यांनी काढलेल्या आज्ञा, तसेच इतर पर्यावरण विषयक बाबींचा अभ्यास आपणास करता येतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी जय व्यवस्थापन करत असताना गड किल्ल्यांवरील जलव्यवस्थापन व सपाट

प्रदेशावरील जलव्यवस्थापन अशी रचना केलेली आपली दिसून येते. असे प्रतिपादन प्रा. डॉ. . दिनेश कचकुरे यांनी केले

.




छत्रपती शिवाजी महाराजांवर व्याख्यान देतांना प्रा. डॉ. दिनेश कचकुरे






छत्रपती शिवाजी महाराज जयंती प्रसंगी सर्व कर्मचारी




कार्यक्रम पत्रिका






www.maharashtratimes.com

एकमेव नि:पक्ष वृत्तपत्र

# महाराष्ट्र टाइम्स

फुलंब्री : श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय व राजर्षी शाहू महाविद्यालयातर्फे (पाथ्री) शिवरायांना अभिवादन करण्यात आले. प्रा. डॉ. दिनेश कचकुरे यांनी 'शिवकालीन पर्यावरण धोरण' या विषयावर मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, शिवकालीन पर्यावरण समजून घेताना मानवी कर्तृत्व आणि नेतृत्वाला अधिष्ठान प्राप्त झालेले होते. महाराजांची दूरदृष्टी आणि पर्यावरणीय विचार लक्षात घ्यावा लागेल. इतिहास विभागप्रमुख प्रा. विजय पांडे यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. एस. आर. टकले अध्यक्षस्थानी होते.

# प्रकल्प लेखन आणि इतिहास संशोधन कार्यशाळा

**कार्यक्रमाचे नाव:** **प्रकल्प लेखन आणि इतिहास संशोधन कार्यशाळा**
**विभाग:** इतिहास
**कार्यक्रम पद्धती:** ऑनलाइन व्याख्यान
**दिनांक:** **9 जुलै 2021**
**वेळ:** 11.00 स.
**सुत्रसंचलन:** प्रा. विजय पांडे
**अध्यक्ष:** डॉ. एस. आर. टकले
**अध्यक्ष:** डॉ. केशव लहाने
**सहभागी:** श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री, पंडित जवाहरलाल नेहरु महाविद्यालय, औरंगाबाद, संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव, प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण, इंद्रराज महाविद्यालय, सिल्लोड व राजर्षी शाहू महाविद्यालय, पाथ्री
एकूण : 72
**स्वरूप:** ऑनलाईन -महाविद्यालयीन
**विषय:** प्रकल्प लेखन आणि इतिहासातील संशोधन
**वक्ते:** **प्रा. डॉ. केशव लहाने**
**उद्दिष्टे:**

1. प्रकल्प लेखनावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे.
2. इतिहासातील संशोधन व टप्पे विद्यार्थ्यांना संक्रमीत करणे.
3. उद्दिष्टे संशोधन पद्धती, विषयाचे महत्त्व, संशोधनाचे गृहितके, संशोधनाचा आराखडा निष्कर्ष, संदर्भसूची, यासंदर्भात माहिती देणे.

**व्याख्यानाचा गोषवारा:**

पंडित जवाहरलाल नेहरु महाविद्यालय, औरंगाबाद, श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री, राजर्षी शाहू महाविद्यालय, पाथ्री, संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव, प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण, इंद्रराज महाविद्यालय, सिल्लोड यांच्या संयुक्त विद्यमाने इतिहास विषयाच्या बी. ए. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी **प्रकल्प लेखन आणि इतिहास संशोधन कार्यशाळा** या विषयावर **9**

**जुलै 2021** रोजी Google Meet (Link cmt-gzsw-kof) या ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे **उद्घाटक,** प्रा. डॉ. आर. एन. करपे, व्यवस्थापन परिषद सदस्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे होते. तर **अध्यक्ष** प्रा. डॉ. व्ही. बी. लांब, इतिहास अभ्यास मंडळ अध्यक्ष, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे होते. कार्यक्रमाचे **प्रमुख वक्ते** प्रा. डॉ. केशव लहाने, राजर्षी शाहू महाविद्यालय, पाथ्री हे होते. या कार्यक्रमास डॉ. गणेश अग्निहोत्री, प्राचार्य, पंडित जवाहरलाल नेहरु महाविद्यालय औरंगाबाद, डॉ. एस. आर. टकले, प्राचार्य, श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय. फुलंब्री, डॉ. एस. बी. जाधव, प्राचार्य, राजर्षी शाहू महाविद्यालय, पाथ्री, डॉ. शिवाजी अंभोरे, प्राचार्य, संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव, प्राचार्य डॉ. एस. जी. सोनकांबळे, प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण, प्राचार्य डॉ. प्रमोद शर्मा, इंद्रराज महाविद्यालय, सिल्लोड हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सर्जेराव बनसोडे यांनी केले. याप्रसंगी त्यांनी इतिहासाचा 12 वा व 16 वा पेपर एकत्र करून त्याचा प्रोजेक्ट वर्क या नावाने पेपर तयार होतो. तो 100 गुणांसाठी असून त्यातील 80 गुण हे लिखाणासाठी तर 20 गुण हे सादरीकरणासाठी असतात हे सांगितले.

कार्यक्रमाचे उद्घाटन करताना प्रा. डॉ. राजेश करपे यांनी 2015- 16 पासून बी. ए. तृतीय वर्षाला हा पेपर सुरू झालेला असून या पेपरमुळे विद्यार्थ्यांना संशोधनाची आवड निर्माण होईल. त्याचबरोबर पदव्युत्तर शिक्षणासाठी गेल्यानंतर संशोधनात येणाऱ्या अडचणी त्यांना येणार नाही, असे सांगितले.


कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. डॉ. केशव लहाने यांनी प्रकल्प लेखनावर सविस्तर असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. याप्रसंगी त्यांनी संशोधन विषयाची निवड कशी करावी? संशोधन विषयाची निवड करत असताना सदर विषयाचे संशोधकास काही प्रमाणात ज्ञान असावे. त्याचबरोबर स्थानिक इतिहासाला विषय निवड करताना प्राधान्य द्यावे असे सांगितले. त्याचबरोबर प्रोजेक्ट लिखाणातील टप्पे स्पष्ट करत असताना विषयाची उद्दिष्टे संशोधन पद्धती, विषयाचे महत्त्व, संशोधनाचे गृहितके, संशोधनाचा आराखडा म्हणजेच प्रकरण योजना, निष्कर्ष किंवा समारोप, संदर्भसूची, संदर्भ कशा पद्धतीने दिले पाहिजेत यासंदर्भात विस्तृत असे विवेचन केले.


कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप प्रा. डॉ. व्यंकटेश लांब यांनी केला. यावेळी त्यांनी संशोधनाकडे विद्यार्थ्यांनी फिरवलेली पाठ याविषयी चिंता व्यक्त केली. तसेच जागतिक इतिहासाबरोबरच स्थानिक इतिहासालाही आपण जर महत्त्व दिले तर आपल्या राष्ट्राचा एकत्रित व गौरवशाली इतिहास लिहिला जाऊ शकतो असे प्रतिपादन केले.


कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विजय पांडे यांनी केले, तर आभारप्रदर्शन प्रा. भास्कर टेकाळे यांनी केले.


या कार्यक्रमास आयोजक महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राचार्य, इतिहास विभागाचे प्राध्यापक ऑनलाइनरित्या उपस्थित होते.

प्रा. सर्जेराव बनसोडे, प्रा.. गोविंद फड, प्रा. विजय पांडे, डॉ. दिनेश कचकुरे, डॉ. केशव लहाने, डॉ. शिरीष पवार, प्रा. भास्कर टेकाळे, प्रा. डॉ. आर. एन. करपे, डॉ. सुवर्णा पाटील, प्रा. डॉ. व्ही. बी. लांब यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.












उद्घाटनपर बोलताना
प्रा. डॉ. आर. एन. करपे





प्रमुख वक्ते म्हणून बोलताना
प्रा. डॉ. केशव लहाने




अध्यक्ष म्हणून बोलताना
प्रा. डॉ. व्ही. बी. लांब




प्रास्ताविक करताना
प्रा. सर्जेराव बनसोडे




सूत्रसंचालन करताना
प्रा. विजय पांडे




आभार व्यक्त करताना
प्रा. भास्कर टेकाळे

## एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र
## सामाजिकशास्त्रातील संशोधनपद्धती
## 28 जुलै 2021
## कार्यक्रम अहवाल

| | |
|---|---|
| **कार्यक्रमाचे नाव:** | **प्रकल्प लेखन आणि इतिहास संशोधन कार्यशाळा** |
| **विभाग**: | इतिहास |
| **कार्यक्रम पद्धती**: | ऑनलाइन सेमिनार |
| **दिनांक:** | **28 जुलै 2021** |
| **वेळ**: | 11.00 ते 3.00 |
| **सुत्रसंचलन**: | डॉ. मनिषा काळे, डॉ. मकरंद जोशी, डॉ. दिनेश कचकुरे, डॉ. केशव मोरे |
| **सहभागी**: | श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री, प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण व विनायकराव पाटील महाविद्यालय, कन्नड<br>एकूण : 275 |
| **स्वरूप**: | ऑनलाईन – राष्ट्रीय |
| **विषय**: | सामाजिकशास्त्रातील संशोधनपद्धती |
| **वक्ते:** | **कुलगुरू प्रोफेसर डॉ. प्रमोद येवले, डॉ. जगमीत भावा, प्रोफेसर डॉ. धनश्री महाजन, डॉ. गोपाळ जी सिंग, प्र-कुलगुरू प्रोफेसर डॉ. श्याम शिरसाट** |

**व्याख्यानाचा गोषवारा:**

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री, प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण व विनायकराव पाटील महाविद्यालय, कन्नड यांच्या इतिहास विभागांच्या वतीने संयुक्तपणे आयोजित सामाजिक शास्त्रातील संशोधन पद्धती या विषयावर दिनांक 28 जुलै 2021 रोजी एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे ऑनलाइन रित्या आयोजन करण्यात आले.

**उद्घाटन समारंभ:**

सकाळी 11 वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद चे कुलगुरू प्रोफेसर डॉ. प्रमोद येवले यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी त्यांनी सामाजिक शास्त्रातील संशोधन पद्धती व भौतिक शास्त्रातील संशोधन पद्धती यावर प्रकाश टाकून संशोधन हे समाज उपयोगी असले पाहिजे असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. राजेश करपे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मनिषा काळे यांनी केले तर आभार प्रदर्शन विजय पांडे यांनी केले.

**सत्र पहिले:**

11:30 ते 12:30 या कालावधीमध्ये चर्चासत्राचे पहिले सत्र संपन्न झाले. Research in Social Sciences: Condition and Direction या विषयावर डॉ. जगमीत भावा, विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग, हिमाचल प्रदेश केंद्रीय विद्यापीठ, धर्मशाळा, यांनी चर्चासत्रातील सहभागींना सखोल अशी मार्गदर्शन केले.

या सत्राचे अध्यक्षपदी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मानव्यविद्या शाखेच्या अधिष्ठाता प्रोफेसर डॉ. धनश्री महाजन या होत्या.

या सत्राचे सूत्रसंचालन डॉ. मकरंद जोशी यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. सुवर्णा पाटील यांनी केले.

**सत्र दुसरे:**

12:30 ते 1:30 या कालावधीमध्ये चर्चासत्राचे दुसरे सत्र संपन्न झाले. Research trends in social sciences या विषयावर डॉ. गोपाळ जी सिंग, अर्थशास्त्र विभाग, मगध विद्यापीठ, बोधगया, यांनी साधन व्यक्ती म्हणून सहभागींना मार्गदर्शन केले.

या सत्राच्या अध्यक्षपदी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रोफेसर डॉ. व्यंकटेश लांब हे होते.

या सत्राचे सूत्रसंचालन डॉ. दिनेश कचकुरे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. सुधीर पवार यांनी केले.

**समारोप समारंभ:**

1:30 ते 2:30 या कालावधीमध्ये चर्चासत्राचे समारोप सत्र संपन्न झाले. या सत्रात डॉ. आर टी बेद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या सत्राच्या अध्यक्षपदी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठा चे प्र-कुलगुरू प्रोफेसर डॉ. श्याम शिरसाट हे होते.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्राचार्य डॉ. शरद गावंडे यांनी केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. केशव मोरे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. शरद गावंडे यांनी केले.

## प्रकल्प सादरीकरण

महाविद्यालयातील मुख्य विषय इतिहास घेतलेल्या विद्यार्थ्यांचे प्रकल्प सादरीकरण महाविद्यालयात दि. 21 ऑगस्ट 2021 रोजी घेण्यात आले. यावेळी 5 विद्यार्थ्यांनी प्रकल्प सादरीकरण केले. बहिस्थ परिक्षक म्हणून राजर्षी शाहू महाविद्यालय पाथ्री येथील इतिहास विभाग प्रमुख डॉ. केशव लहाने हे उपस्थित होते.